## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ७१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/१०/२०१७

**१) संगनमत करुन भांडण करुन स्टिलचे बादलीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १३/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी केशव किसन चौधरी वय ४२ वर्ष, रा. वडेगाव खांबा हा त्याचे घरी रोडने जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ ने तु आमचे पार्टी मधुन दुसऱ्या पार्टीत गेला असे म्हणुन भांडण केले व स्टिलचे बादलीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले व अरोपी क्र. २ नी भांडण करुन थापडाने मारल्याने फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**२) पैसे मागण्याचे कारणावरुन भांडण करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनिल नागोराव चचाणे वय २६ वर्ष, रा. देशबंधु वार्ड भंडारा याचा भाऊ सुनील याने आरोपीला १००/—रु. मागण्यास पाठवीले असता, 'तुझे कश्याचे पैसे आहेत' असे म्हणुन भांडण करुन फिर्यादीस दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा . काटेखाये पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) नाल्यामध्ये अभ्रक मृत अवस्थेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे ०८.१६ वाजता दरम्यान यातील नवजात अभ्रक हे मृत अवस्थेत गोपीकिसन अग्रवाल शाळेसमोर देव्हाडी रोडकडे जाणाऱ्या वाहत्या पाण्याच्या नाल्यामध्ये उबडया स्थितीत मिळुन आल्याने मृतक अभ्रकाचे पि. एस करण्यास आले असुन एमओसा निसुलकर सु. बो. दवाखाना तुमसर याने मृतकाबाबत अभ्रकाची वाढ होवुन अभ्रक जन्मता मृत असल्याचा अभिप्राय दिला आहे. तरी मृतक अभ्रक हा अज्ञात व्यक्तीने अपत्य जन्माची लपवणुक करण्याचे उद्येशाने आणुन टाकल्याने चौकशी वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३१८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**४) प्राणी निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील चालक आरोपीतांनी आपले ताब्यातील ट्रक क्र. एम एम ३५/ के ५१२३ मध्ये २४ बैल किंमती २,४०,०००/—रु. चे निदर्यतेने भरुन नेत असतांनी व कुठल्याही प्रकारचा जनावरे वाहतुक परवाना नसतांना मिळुन आल्याने व पोलीसांचा ईशारा भंग पळुन गेल्याने त्यास पकडुन कारवाही करीता पोस्टेला आणल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. कुकडे पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ११(१)(ड)(इ) प्रा. णी. वा. प्र. कायदा. सहकलम ११९ मपोका. सहकलम १८४,१३२,८३,६६/१९२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**५) प्राणी निदर्यतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/१०/२०१७ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एम एम ३१/ एपी १०७७ मध्ये ४ म्हशी, १२ रेंडे किंमती १,६०,०००/—रु. चे निदर्यतेन अरुंद जागेत, चारा पाण्याची सोय न करता कोंबुन भरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोंगाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड)(इ) प्रा. णी. वा. प्र. कायदा. सहकलम ५८ अ(१) प्रा. स.का. सहकलम ८३/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी .बोरकर पो. स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) शिवीगाळ करुन डोक्यावर विटेचा तुकडा मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गांधी चौक कडुन त्याचे घरी जात असतांना यातील आरोपी हा फिर्यादीस पाहुण शिवीगाळ करीत असतांनी त्यास तु मला शिवीगाळ करतोस असे हटकले असता आरोपीने विटेचा तुकडा फेकुन मारल्याने फिर्यादीचे डोक्यावर लागुन जखमी झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३३६,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

७) विहरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–

दिनांक १४/१०/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील मृतक गणेश प्रभु सोनकर रा. जाम हा दारु पिवुन दारुचे नशेत सार्वजनीक विहीरीत कुंदुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी दिनेश प्रभु सोनकर वय ३५ वर्ष, रा. जाम यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोउपनी. इंगळे पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

८) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/१०/२०१७ चे १७.३० ते १७.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स वाहन हा आमरोडवर बेवारस स्थितीत ऊभे करुन वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सांबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १४/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०७ तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.